म. टा. पु. पा. १.

# ‘कत्तलखान्याचे कंत्राट रद्द करा’

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

## माजी आ. नरेंद्र मेहता यांची मागणी



मिरा-भाईंदरमध्ये कत्तलखाना उभारण्याची निविदा मनपाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. याला माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी विरोध दर्शवला आहे. शहरात कत्तलखान्याची आवश्यकता नसल्याचे सांगत,कंत्राट रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे.अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच हे काम आमदार गीता जैन यांच्या सहमतीने केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

भाईंदर पश्चिमेच्या खापरा गावाजवळ असणाऱ्या सर्वे क्र. ३५२ (अ) च्या जागेत कत्तलखाना उभारण्याच्या हालचाली मनपाच्या सुरू आहेत. त्याकरता मनपाकडून ४० कोटी रुपयांची निविदा नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडून मूलभूत सोयीसुविधा योजनेंतर्गत ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातून हे काम केले जाणार आहे. याला आता भाजपचे माजी आमदार मेहता यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे.

कत्तलखाना उभारला जाणाऱ्या परिसरातील नागरिकांना किंवा शहरवासीयांना त्याची आवश्यकता नाही. मिरा- भाईंदरलगत अनेक मोठी शहरे आहेत. तेथेही कत्तलखाना नाही. त्यामुळे कत्तलखान्याचे कंत्राट १० ऑक्टोबरपूर्वी रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे. या कत्तलखान्याच्या निविदा प्रक्रियेसाठी अवघा सहा दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आल्याबद्दलही त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. हे काम आ. जैन यांच्या मतदारसंघात केले जात आहे. त्यामुळे प्रशासनाने त्यांना विश्वासात घेतच ही कार्यवाही हाती घेतली असल्याचा दावा त्यांनी केला आहे. यावर जैन यांनी आपल्याला कत्तलखान्याच्या संदर्भात काही माहिती नाही, असे उत्तर दिले. त्यावर तसे असेल तर त्यांना स्थानिक आमदार म्हणून राहण्याचा अधिकार नाही. त्यांनी तात्काळ पदाचा राजीनामा द्यायला हवा, असेही मेहता यांनी रविवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

### आमदार सरनाईक यांच्या पाठपुराव्यामुळे निधी

मेहता यांच्याकडून जैन यांच्यावर आरोप केले जात असले तरी कत्तलखान्यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांच्या पाठपुराव्यानुसार निधी मंजूर झाला असल्याचे विश्वसनीय सुत्रांकडून समजते. त्यामागे ठाणे व मिरा-भाईंदरमधील प्रामुख्याने ओवळा-माजिवडा विधानसभा क्षेत्रात १८०० कोटींची कामे सप्टेंबर महिन्यात मंजूर करण्यात आली आहेत. यात कत्तलखान्याचाही समावेश आहे. केवळ कत्तलखाना वगळता इतर सर्व कामे सरनाईकांच्या मतदारसंघातील आहेत, हे त्यामागील कारण आहे.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

नालासोपाऱ्यात राहणाऱ्या १३ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. या मुलीचे अश्लील छायाचित्रण करून त्या आधारे तिच्याकडून खंडणीही उकळली आहे. याप्रकरणी तुळींज पोलिसांनी एका तरुणीसह तरुणावर गुन्हा दाखल केला आहे. या दोघांना अटक करण्यात आली असून त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

१३ वर्षांची पीडित मुलगी नालासोपारा येथील असून तिची ओळख सीमा मोर्या (२६) या तरुणीशी झाली होती. तसेच, २०२३मध्ये सीमाने या मुलीची सोनू सहानी (२४) याच्याशी ओळख करून दिली. त्यानंतर सोनू सहानी पीडितेला कळंब, राजोडी येथील लॉजवर नेऊन तिच्यावर बलात्कार करत होता. त्यावेळी त्याने पीडितेची अश्लील छायाचित्रे काढली होती. ही छायाचित्रे व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्याकडून खंडणी उकळली.

Scanned with OKEN Scanner

लोकमत

पु-पा-४

पु-पा-१.

# आजी-माजी आमदारांत कत्तलखान्यावरून जुंपली

## टेंडर रद्द झाले नाही, तर उडी मारेन - मेहता

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** राज्य शासनाच्या निधी मंजुरीनंतर मीरा भाईंदर पालिकेने उत्तन येथे कत्तलखान्याच्या कामाची निविदा काढण्यावरून आ.गीता जैन आणि माजी आ.नरेंद्र मेहता यांच्यात पुन्हा खडाजंगी झाली. १० ऑक्टोबरपर्यंत निविदा रद्द झाली नाही तर महापालिका इमारतीवरून उडी मारेन असा इशारा मेहतांनी दिला आहे. तर मेहतांना उडी मारायची तर आताच मारा, १० तारखेची वाट का पाहता, असे प्रत्युत्तर आ. जैन यांनी दिले.

माजी आ. नरेंद्र मेहता यांनी प्रसिद्धिमाध्यमांशी बोलताना सांगितले की, मीरा-भाईंदरमध्ये ४० कोटी खर्चाच्या कत्तलखान्याचे टेंडर आ. गीता जैन यांच्या मतदारसंघात परवा रात्री गुपचूप काढले. ४० कोटींच्या टेंडरसाठी ६ दिवसांचा कालावधी दिला आहे. ५ लाखांचे काम असले तरी १५ दिवसांचा कालावधी निविदेचा असतो. शहरात सर्व जातीधर्माचे लोक राहतात. खाणे आणि विकण्याबद्दल विरोध नाही. परंतु शहरात कत्तलखान्याची गरज नाही. हा कत्तलखाना रद्द केला नाही तर पालिकेच्या इमारतीवरून उडी मारेन. जिवंत आहे तोपर्यंत कत्तलखान्याची वीट लावू देणार नाही, असा इशारा नरेंद्र मेहता यांनी दिला आहे.



### बिना जाळी बघून उडी मारा - आ.जैन

■ आ. गीता जैन यांनी मेहतांच्या आरोपांना प्रत्युत्तर देत त्यांच्यावर बोचरी टीका केली. उडी मारायची तर आताच मारा. कशाला १० तारखेची वाट पाहता? बिना जाळी बघून उडी मारा. मेहता कधी सन्मानाने बोलत नाहीत. खोटे बोलणे, स्टंट करणे त्यांच्या स्वभावातच आहे, असे त्या म्हणाल्या.

### ...म्हणून स्टंट केला असेल

मेहता यांना तांत्रिक बाबी माहीत नाही का? कदाचित ८ वी नापास माणसाला थोडी अडचण येऊ शकते, असा टोला मेहतांना लगावला. मेहतांना माझ्या कत्तलखाना विरोधातील पत्राबाबत माहिती पडली असावी म्हणून त्यांनी असा स्टंट केला असावा. यात काही गोलमाल आहे असा संशय आ. जैन यांनी व्यक्त केला. कत्तलखान्याचा विरोध आपण आधीपासून केला असून आतादेखील निविदा बेकायदेशीर असून तसे पत्र दिले आहे, असे जैन म्हणाल्या.

# स्वस्त घराच्या आमिषाने गंडा




**नालासोपारा :** वसईच्या राजावली येथील पाल बिल्डर चाळीत राहणाऱ्या हरिश्चंद्र यादव (३७) यांची १ ते ३० मे २०२३ दरम्यान स्वस्त घर देण्याचे आमिष दाखवून फसवणूक झाली आहे. राजावली यांनी अवनी बिल्डर ॲन्ड डेव्हलपर्स कंपनीतर्फे मालक आशिष मिश्रा आणि भागीदार विकास सिंग यांनी स्वस्त घर देण्याचे आमिष दाखवून घरासाठी २ लाख ५१ हजार रुपये घेतले. ते पैसे परत न करता त्यांची फसवणूक केली आहे. वालीव पोलिसांनी याप्रकरणी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

# रिक्षाची चोरी

**नालासोपारा :** संतोष भवनच्या गरेलपाडा येथील बजरंगबली चाळीत राहणारे रिक्षा चालक शुभम जयस्वाल (२८) यांची ५० हजार रुपये किमतीची रिक्षा चोरीला गेली आहे. शुक्रवारी रात्री श्रीराम नगरच्या नाक्याजवळील उसनुमा किराणा दुकानाच्या समोर त्यांनी रिक्षा पार्क केली होती. चोरट्याने रिक्षा चोरी करून नेल्याने पेल्हार पोलिसांनी शनिवारी वाहनचोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# तरुणाची आत्महत्या



**नालासोपारा :** विरारच्या जीवदानी रोडवरील भोईरपाडा येथील शिवकृपा सोसायटीत राहणाऱ्या सत्यनारायण महापात्रा (३०) या तरुणाने आत्महत्या केली आहे. शनिवारी सकाळी त्याने घराच्या बेडरूममधील सीलिंगच्या कडीला बेडशीटच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. विरार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# गळफास घेऊन आत्महत्या

**नालासोपारा :** गोखिवरे गावातील मुनिश ग्लोरियस बिल्डिंग नंबर १ मध्ये राहणारे अफसर शेख (५०) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी शनिवारी सकाळी नैराश्येतून किचनमधील पंख्याला गळफास घेत आत्महत्या केली आहे. वालीव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु. पा. ३.

## एटीएम फोडण्याचा प्रयत्न; गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** संतोष भवनच्या बावशेतपाडा येथील एटीएम फोडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना शुक्रवारी घडली होती.

तुळींज पोलिस शुक्रवारी रात्री साडेतीन वाजेच्या सुमारास गस्त घालत असताना ३ आरोपी बावशेतपाडा येथील एटीएमचा कॅमेरा तोडून चाकू, स्क्रू ड्रायवर व पकडीच्या सहाय्याने एटीएम मशीनच्या पुढील स्क्रीनची बाजू खोलून व खालील बाजूचा पत्रा वाकवून एटीएम फोडून चोरी करण्याचा प्रयत्न करताना आढळले. पोलिस शिपाई सत्यजित दोरगे यांनी शनिवारी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन १५ ते १७ वयोगटातील तिन्ही विधिसंघर्ष बालकांविरुद्ध तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# दादा, जरा जपून चाल!

फोटो स्टोरी

मंगेश कराळे







लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई-विरारमधील बहुतांश परिसरांतील गटारांची दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी गटारांवरील झाकणे गायब झाली आहेत, तर अनेक ठिकाणी तुटलेली आहेत. पदपथावर असलेले चेंबर फुटले, तुटलेले आहेत. या पदपथावरून ये-जा करणारे पादचारी यांचे दुर्लक्ष झाले तर गटारात पाय जाऊन दुर्घटना घडू शकते. पावसाच्या पाण्यामुळे उघडी गटारे कित्येकदा दिसून येत नाहीत. अशा वेळी अपघात होण्याची शक्यता अधिक वाढते. याकडे वसई-विरार मनपाने लक्ष देण्याची गरज आहे की पालिका अपघात होण्याची वाट पाहत आहे का, असा संतप्त प्रश्न स्थानिक विचारत आहेत.

### गटारावरील लोखंडी झाकणे चोरीला

मनपा हद्दीतील अनेक ठिकाणी गटारावरील लोखंडी झाकणे चोरीला गेली आहेत. याप्रकरणी मनपाने वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात झाकणे चोरीला गेल्याचे गुन्हे दाखल केले आहेत.

### मनपात शेकडो तक्रारी

गटारांची झाकणे तुटलेली बदली करण्यासाठी तसेच गटारांवर झाकणे लावण्यासाठी नागरिक मनपात तक्रारी करतात. पावसाळ्यापूर्वी अनेक राजकारणी, सामाजिक संस्था, समाजसेवक मनपा अधिकाऱ्यांना निवेदन देऊन पत्रव्यवहार करतात. मागील नऊ महिन्यांच्या कालावधीत गटारांच्या समस्येवर शेकडो तक्रारी नागरिकांनी मनपात केल्या आहेत.

वारंवार करण्यात आलेल्या डांबरीकरणामुळे रस्त्यांच्या मध्यभागी, कडेला असलेली ड्रेनेजची झाकणे खोलवर जातात. त्यात वाहने जोरदार आदळून गाडीचे सुटेसुटे भाग खराब होतात. त्याचबरोबर पाठीला आणि कंबरेला धक्का बसतो.

**- संदीप पाटील, चालक**

काही ठिकाणी चेंबरवरील झाकणे गायब असतात. त्यामुळे जोरदार पावसात तसेच रात्रीच्या सुमारास अंधारात अशा चेंबरचा अंदाज येत नाही. त्यात पडून नागरिक गंभीर जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

**- टेरेन्स हेन्ड्रीकीस, आरटीआय कार्यकर्ते**

पुढारी

पु.पा-१

# वर्सावे पुलावर बेकायदा घोडागाडी शर्यत, ६ घोडे ताब्यात, ३ अटकेत



**विरार : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद महामार्गा जवळील वर्सावे येथे घोडागाडी शर्यत आयोजित करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी प्राण्यांसाठी काम करणाऱ्या पेटा संस्थेने दिलेल्या तक्रारीनुसार काशिगाव पोलिसांनी कारवाई करून ६ घोड्यांची सुटका केली आणि ३ जणांना अटक करण्यात आली आहे.

वर्सावे पुलावर मध्यरात्री घोडागाडी शर्यत होणार असल्याची माहिती पेटा (पिपल फॉर द एथिकल ट्रिटमेंट ऑफ निमल) या प्राण्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेने मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तांना दिली होती. त्यानुसार मध्यरात्री काशिगाव पोलिसांनी या वरसावे नाका परिसरात गस्त घातली होती.

रात्री साडेबाराच्या सुमारास काही तरुणांचा गट घोडागाडी शर्यत करत असल्याचे आढळून आले. पोलिसांच्या पथकाने त्यांना अडवून ताब्यात घेतले आणि सहा घोड्यांची सुटका केली.

या कारवाईत ओवीन डिमेलो, रन्सी कालतील आणि बेनी परेरा या तिघांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान ही घोडागाडी शर्यत लावून प्राण्यांना क्रूर वागणूक देणे, सार्वजनिक रहदारीस अडथळा आणल्याबद्दल भारतीय न्याय दंडसंहितेच्या कलम २९१, २८१, १२५, ३(५) तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० च्या कलम ११(१) (अ) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

घोडागाडी शर्यत आयोजित करणारे आरोपी हे भाईंदरच्या उत्तन गाव परिसरात राहणारे असून उरूस यात्रेच्या निमित्ताने त्यांनी ही बेकायदेशीर घोडागाडी शर्यत लावली होती. पोलिसांनी या कारवाईत ६ घोड्यांची सुटका केली असून त्यांना वसईच्या सकवार येथील पशू आश्रमात ठेवण्यात आले आहे.

पु.पा-३.

# मोबाईल टॉवरमधील आझना कार्ड चोरणारे गजाआड

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

मोबाईल टॉवरमधून रेडिओ फ्रिक्वेन्सीसाठी लावण्यात येणारे मशीन (आझना कार्ड) चोरी करून आंतरराष्ट्रीय बाजारात विक्री करणाऱ्या ७ आरोपींच्या टोळीला गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांनी अटक केली आहे. या टोळीकडून ४० लाख रुपये किंमतीची ३६ यंत्रे हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

वसई -विरार शहरात गेल्या काही महिन्यांपासून मोबाईल टॉवरवरील नेटवर्कसाठी बसविण्यात आलेले रेडीओ फ्रिक्वेन्सी मशीन (आझना कार्ड) चोरीच्या गुन्ह्यात वाढ झाली होती. या प्रकणाचा गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने तपास सुरू केला होता. घटनास्थळाचे तांत्रिक विश्लेषण करून तसेच मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी शुभम यादव (२४), शैलेश यादव (२५), कपुरचंद्र गुप्ता (२५), बंन्सीलाल जैन (५०), जाकीर मल्लिक (२५), जैद मलिक (१९) आणि मोहम्मद जुनैद मलिक (२४) यांना ताब्यात घेतले आहे. काही आरोपींना दिल्ली, उत्तर प्रदेश येथून ताब्यात घेतले आहे. या आरोपीकडून आतापर्यंत ४० लाख रुपये किंमतीचे ३६ मशिन कार्ड, मोबाईल फोन, दुचाकी मुद्देमाल हस्तगत केला आहे. तसेच विविध राज्यातून चोरी केलेले आझना कार्ड हस्तगत केले आहेत.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पा.नं.९

# काशिमीरा येथे गाय मृतावस्थेत

**मीरारोड :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील काशीमीरा येथील स्व. लता मंगेशकर नाट्यगृहाजवळ एक गाय मृतास्थेत पडून असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष केल्याचा आरोप मनसेने केला आहे. या घटनेची माहिती मनसे पदाधिकारी यांना मिळाल्यानंतर त्यांनी मृत गाईची विल्हेवाट लावण्यास मदत केली आहे.

महाराष्ट्र शासनाने काही दिवसांपूर्वीच गाईला राज्यमाता हा दर्जा दिला आहे. यामुळे राज्यातील गाईंना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. काशीमीरा येथे एका गाईचा ४ ऑक्टोबर रोजी सकाळी मृत्यू झाला. परंतु या गाईवर कोणत्याही प्रकारे प्रक्रिया किंवा ती गाय तेथून ५ ऑक्टोबर संध्याकाळपर्यंत उचलली नव्हती. याची माहिती मनसे शहर अध्यक्ष संदीप राणे यांना मिळाली. राणे यांनी त्यानंतर कोणत्याही गोष्टीचा विलंब न करता त्या ठिकाणी कार्यकर्त्यांसह तात्काळ पोहोचले. संबंधित सर्व अधिकाऱ्यांना जाब विचारला. कोराकेंद्र येथेदेखील संपर्क करून अर्ध्या तासात मृत गायीला उचलले गेली.

मनसेने तत्परता दाखवताच पालिका आरोग्य विभागाचे कर्मचारी देखील तेथे उपस्थित झाले. पंतप्रधान मोदी यांचा शनिवारी ठाणे, मुंबई दौरा असल्याने मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. यामुळे गायीची वाहतूक करणारी गाडी त्याठिकाणी वेळेवर पोहचू शकली नाही. काही वेळाने गाडी आल्यानंतर मृत गाईला उचलून घेऊन गेले असल्याची माहिती पालिकेचे पशुसंवर्धन अधिकारी विक्रम नरटले यांनी दिली.

पुण्यनगरी पा.नं.९.

# कांदळवनाचा ऱ्हास केल्याप्रकरणी गुन्हे

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेला खाडी किनारी तिवरांची झाडे असलेल्या कांदळवन परिसरात मेरिटाइम बोर्डाकडुन पर्यावरण परवानगी न घेता तिवरांच्या झाडांचे नुकसान करून व मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन करत जेट्टीचे काम सुरू आहे. तसेच दुसऱ्या गुन्ह्यात कांदळवन असलेल्या जागेत विनापरवानगी खासगी विकासकाकडून पे- अँड पार्किंग सुरू आहे. याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर जेट्टीचे काम सुरू असलेल्या फक्त ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, महसूल विभागाकडून मेरिटाइम बोर्डाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. त्यांच्यावरही गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

लोकमत पा.नं.५.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## अश्लील छायाचित्रे काढून मागितली खंडणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** शहरातील एका १३ वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिच्या अश्लील छायाचित्रांचा धाक दाखवून २५ हजार रुपयांची खंडणी उकळल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी तुळींज पोलिसांनी एका तरुणीसह दोघांवर पोक्सो, आयटी ॲक्टनुसार शुक्रवारी गुन्हा दाखल केला.

पीडित मुलीची एका २६ वर्षांच्या तरुणीशी ओळख झाली होती. त्यानंतर २०२३ मध्ये या तरुणीने मुलीची एका २४ वर्षांच्या तरुणाशी ओळख करून दिली. त्यानंतर २४ वर्षांच्या या तरुणाने मुलीच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत तिच्यावर बलात्कार केला. यावेळी त्याने या मुलीची अश्लील छायाचित्रे काढून ओळख करून देणाऱ्या मित्राला पाठविली. त्यावेळी त्याने ही छायाचित्रे समाजमाध्यमांवर व्हायरल करण्याची धमकी दिली. त्या मोबदल्यात तिच्याकडून २५ हजार ५०० रुपये उकळले. मात्र पैशांची मागणी वाढत होती. त्यामुळे तिने हा प्रकार अखेर कुटुंबीयांना सांगितला. याबाबत तक्रार दाखल झाल्यानंतर एका आरोपीला अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर ५.१०.

# मीरा-भायंदर में कत्लखाने को लेकर मचा घमासान मेहता ने कहा, एमबीएमसी से कूदकर दे दूंगा जान

- पूर्व विधायक ने दी मनपा प्रशासन को धमकी
- गीता जैन पर कत्लखाना बनवाने का लगाया आरोप

**5 से 8 एकड़ में बनाने की तैयारी** | **40 करोड़ से अधिक का टेंडर निकाला** | **06 दिन में पूरी की गई टेंडर प्रक्रिया** | **08 अक्टूबर को आंदोलन होगा**

भास्कर संवाददाता। भायंदर



उत्तन में कत्लखाना बनाए जाने का जोरदार विरोध शुरू हो गया है। पूर्व भाजपा विधायक नरेंद्र मेहता ने विरोध जताते हुए मीरा-भायंदर मनपा मुख्यालय की इमारत से कूदकर जान दे देने की धमकी दी है। उन्होंने कहा कि स्थानीय विधायक ने पहले जख्म देने, फिर मरहम लगाने की योजना के तहत यह निर्णय लिया है। इसके लिए उनके शव से होकर गुजरना पड़ेगा। मेहता ने कहा कि उनका विरोध खाने या न खाने को लेकर कतई नहीं है। कत्लखाने की टेंडर प्रक्रिया तत्काल रद्द करने की मांग उन्होंने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे से की है।

पत्रकार परिषद में मेहता ने बताया कि उत्तन के भूत बंगला इलाके में तकरीबन पांच से आठ एकड़ में कत्लखाना बनाने की तैयारी मीरा-भायंदर मनपा ने शुरू की है। इसके लिए 40 करोड़ रुपए से अधिक का टेंडर निकाला है। उन्होंने कहा कि मीरा-भायंदर में बड़ी संख्या में जैन, वैष्णव, ब्राह्मण रहते हैं। कत्लखाना में लाखों जानवरों की हत्या होगी। इससे शहर में नकारात्मक ऊर्जा फैलेगी। मेहता ने कहा कि बोरीवली, कांदिवली की आबादी मीरा-भायंदर से तीन गुना अधिक है। वहां एक भी कत्लखाना नहीं है। फिर मीरा-भायंदर में इसकी क्या जरूरत थी? उन्होंने स्थानीय विधायक गीता जैन को कटघरे में खड़ा किया और कहा कि जैन को सब कुछ पता है, फिर भी उनका मूक समर्थन है। पूर्व विधायक ने कहा कि जैन ने पहले जख्म देने और बाद में मरहम लगाने की राजनीतिक योजना के तहत में ऐसा किया है। जैन समाज का होकर ऐसा करना बहुत बड़ा पाप है। इसके लिए उन्हें जैन समाज कतई माफ नहीं करेगा।

**प्रक्रिया चोरी-चुपके शुरू की गई:** मेहता ने कहा की एक-दो लाख रुपए का काम भी रहता है तो उसके लिए 15 दिन पहले टेंडर प्रक्रिया शुरू होती है, लेकिन 40 करोड़ रुपए के काम की टेंडर प्रक्रिया सिर्फ छह दिन में पूरी कर ली गई। कत्लखाना बनाने की प्रक्रिया चोरी-चुपके शुरू की गई थी। इस कदम से हिंदू, जैन, ब्राह्मण, वैष्णव की भावनाएं आहत हुई हैं। उन्होंने कहा कि उनकी जान चली जाएगी, लेकिन वे कत्लखाना नहीं बनने देंगे। 8 अक्टूबर को इसके विरोध में आंदोलन करेंगे। फिर भी न्याय नहीं मिला तो मनपा इमारत से कूदकर जान दे देंगे।

**मुझे जानकारी नहीं थी: जैन**

गीता जैन ने कहा कि नई डीपी अभी तक फाइनल नहीं हुई है, ऐसे में टेंडर ही अवैध है। इसे रद्द करने के लिए उन्होंने मनपा आयुक्त को पत्र लिखा है। उन्होंने कहा कि तीन अक्टूबर को टेंडर निकाला गया। दो दिन से प्रधानमंत्री के कार्यक्रम में व्यस्त थी, इसलिए उनको इसकी जानकारी ही नहीं थी।

# पुनर्विकास के नाम पर काटे गए हरे-भरे वृक्ष

**नालासोपारा,** (सं), अचोले स्थित सोसायटी के पुनर्विकास के लिए परिसर में लगे दर्जनों हरे भरे और विशाल वृक्ष को काट दिया गया. इस मामले की शिकायत के बावजूद वसई विरार मनपा का वृक्ष प्राधिकरण विभाग दोषी लोगों के खिलाफ कार्रवाई करने के बजाय उसे नजरअंदाज कर मामले को टालमटोल कर रहा है. इस बाबत शिकायत कर्ता दीपक मदन लाल शाह ने बीते 7 अगस्त 2024 को कार्रवाई की मांग करते हुए वसई विरार मनपा मुख्यालय को लिखित पत्र देकर बताया था कि कुल वैभव नगर, आचोले रोड स्थित गोकुल आरबीआई एम्प्लॉईज सोसायटी व रघुकुल कॉ.ओ. हा. सोसायटी बीते नवंबर - दिसंबर 2023 में पुनर्विकास के लिए ध्वस्त कर दिया गया था. गोकुल आरबीआई कर्मचारी सोसायटी को ध्वस्त करने से पहले उस सोसायटी के परिसर में 4 नारियल के पेड़, 1 नीम और 6-8 फूल वाले पेड़ और एक पीपल का पेड़ था. और रघुकुल कंपनी ओ हा. सोसायटी में 4-5 नारियल और फूलों के पेड़ थे.

**वन विभाग कर रहा नजरअंदाज**

← नवभारत ५.१०.२.

Hindustan Times P-6

# 3 held for organising horse-cart race on Mum-Ahm highway



e video captured by a motorist shows the accused mercilessly iipping the horses with canes to make them run faster.

Megha Sood

megha.sood@htlive.com

MUMBAI: Three men were arrested on Sunday for allegedly organising and participating in an illegal horse-cart race on the Mumbai-Ahmedabad highway on Saturday night. The police rescued six horses who were subjected to cruelty.

According to the Kashigaon police, they acted on a complaint filed by a non -governmental organisation, People for the Ethical Treatment of Animals (PETA) India, which had alerted them about the race. After submitting a complaint to Madhukar Pandey, the commissioner of police, Mira Bhayander-Vasai-Virar (MBVV), PETA India collaborated closely with Avinash Ambure, deputy commissioner of police, after which an FIR was registered under sections 291 (negligent handling of animals), 281 (punishment for rash driving); 125 (endanger a person's life), and 3(5) (multiple people committing crime with a common intention) of the BNS along with sections 11(1)(a) (treating animals cruelly) and 11(1)(l) (failure to provide basic needs) of The Prevention of Cruelty to Animals (PCA) Act, 1960.

The officers said that they reviewed videos submitted by PETA. The footage showed three horse riders racing carts on the newly constructed Versova bridge at the Mumbai-Ahmedabad highway, creating a dangerous situation for both the horses and motorists. "We have arrested the accused and are working to identify the remaining occupants of the carts involved in the race," said an officer.

The animal protection group said that they shared a video showing the men mercilessly whipping and beating horses, forcing them to run amid the chaos of noisy motorcycles and shouting riders.

"We commend the MBVV police for sending a clear message that cruelty to animals will not be tolerated," said Sunayana Basu, PETA India's Cruelty Response Coordinator.

"Horse races are cruel, as participants force the animals to run while being hit and weapons are used on them. The horses endure extreme physical strain, which often results in injury and always causes suffering. The mental trauma and physical torture these malnourished and weak horses must have endured is hard to imagine," added Basu.

Horse-cart race, formally known as harness racing, is a game where horses pull a lightweight cart called a sulky with a driver riding behind them. Animal rights advocates often raise concerns about the welfare of the horses in such games. For example, in some cases, horses might be subjected to illegal or inappropriate medications to enhance performance leading to long-term health consequences. The riders often beat the horses mercilessly leading to injuries.